# ज्येष्ठांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध

## राजकुमार बडोले : सामाजिक न्याय विभागाच्या वतीने 'ज्येष्ठोत्सव'



**पुणे :** ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त ज्येष्ठोत्सव कार्यक्रमात मान्यवरांना मंत्री राजकुमार बडोले यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

**पुणे : प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. शासनाने नुकत्याच जाहीर केलेल्या ज्येष्ठ नागरिक धोरणातील आर्थिक योजना राबविण्याचा लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री राजकुमार बडोले यांनी आज येथे दिले.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभाग व ॲस्कॉप संस्थेच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त 'ज्येष्ठोत्सव २०१८' या विशेष कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बडोले बोलत होते.

> *अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना ज्येष्ठ नागरिक धोरणाला मान्यता मिळाली. पण गेल्या दहा वर्षांत काँग्रेस सरकारला ते राबविता आले नाही. भाजप सरकारने जाहीर केलेल्या धोरणाचा ज्येष्ठांना शासकीय सवलतीसाठी लाभ होईल.*
>
> – **दिलीप कांबळे,** सामाजिक न्याय राज्यमंत्री

याप्रसंगी खासदार अनिल शिरोळे, आमदार प्रा. मेधा कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी इतिहासाचे अभ्यासक प्रा. शां. ग. महाजन, अभिनेते डॉ. मोहन आगाशे, अभिनेत्री दीपा लागू, निवेदक सुधीर गाडगीळ, अभिनेते माधव वझे, व्यंगचित्रकार शि. द. फडणीस, माध्यम विश्लेषक अभिनंदन थोरात, माजी अधिकारी वसंत म्हस्के, कवयित्री अरुणा ढेरे, कथक नृत्यांगणा मनीषा साठे, कवयित्री प्रतिभा शाहू मोडक, विश्वास मेहेंदळे, गझलकार म. भा. चव्हाण, हास्य क्लबचे मकरंद टिल्लू, वयाची शंभरी पूर्ण करणाऱ्या नलिनी देवधर यांचा सामाजिक न्याय विभागाने 'पुण्याचा अभिमान' असा पुरस्कार देऊन सन्मान केला.

बडोले म्हणाले, की, ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच, ज्येष्ठ नागरिक धोरणातील विविध योजनांची माहिती देऊन ज्येष्ठांना एसटी तिकिटामध्ये सवलत देण्याचा निर्णय लवकरच घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

पुणे